पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०८४ दिनांक २५/०९/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशनकडील बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियमाचे गुन्ह्यातील आरोपीस जन्मठेपेची शिक्षा झालेबाबत.**

दिनांक १५/०१/२०१६ रोजी २३:०० वा. सुमारास भारत बेकरी मागे, लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे यातील आरोपी **बापु धर्मा जावळे वय- ३३ वर्षे रा. स. नं.१२, भारत बेकरी मागे, लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे** याने यातील पीडीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग करुन तीला धमकी दिल्याने त्याबाबत यातील पीडीत मुलीचे आईने तक्रार दिल्यावरुन येरवडा पोलीस स्टेशन येथे **गु.र.नं.५८६/२०१६ भा.द.वि. कलम ३५४, ५०६ (१) बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम कलम ३, ४, ७, ८** प्रमाणे गुन्हा दिनांक ०४/०८/२०१६ रोजी दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास तात्कालीन सहा. पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे नेमणुक – येरवडा पोलीस स्टेशन, पुणे यांनी करुन आरोपी विरुद्ध सबळ पुरावा मिळवुन त्याचेविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

सदरची केस मा. श्री. आर. व्ही. आदोने अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, शिवाजीनगर कोर्ट, पुणे यांचे न्यायालयात सुरु असताना येरवडा विभागाचे सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. रामचंद्र देसाई, येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. युनूस शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस उप- निरीक्षक राजेंद्र कांबळे कोर्ट कर्मचारी पोहवा. १०८ चिकणे व पोहवा. ५३२४ शेलार यांनी सातत्याने पाठपुरावा करुन दाखल गुन्ह्यातील पंच, साक्षीदार यांना साक्षकामी न्यायालयात वेळेत हजर करुन त्यांना योग्यते मार्गदर्शन व संरक्षण दिल्याने यातील पंच व साक्षीदार यांनी निर्भय वातावरणामध्ये सरकारी पक्षाचे बाजुने साक्ष दिलेली असुन मा. श्री. आर. व्ही. आदोने अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, शिवाजीनगर कोर्ट, पुणे यांनी यातील आरोपीस जन्मठेप व १०,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ०६ महिने कैद अशी शिक्षा सुनावली आहे. सदर केसमध्ये सरकारी पक्षाचे वतीने ॲड. प्रमोद बोंबटकर यांनी काम पाहीले आहे.